**अनुसूची–दोन**

**सार्वजनिक प्रयोजनाच्या स्वरूपाबाबत विवरण**

| | | |
|---|---|---|
| प्रकल्पाचे नाव | :— | बावनथडी प्रकल्प. |
| प्रकल्प कार्याचे वर्णन | :— | पांजरा लघु कालवा बांधकामाकरीता. |
| समाजाला मिळणारे लाभ | :— | या प्रकल्पामुळे शेतीसाठी पाणी, सार्वजनिक पाणी पुरवठा, क्षेत्र सिंचनाखाली येणार असल्यामुळे शेतकऱ्यांना सिंचनाचा लाभ होणार आहे व त्यांच बरोबर ग्रामिण भागातील कष्टकरी, शेतकरी, शेतमजूर यांना रोजगाराच्या संधी उपलब्ध होणार असून त्यांच्या जिवनमानात सुधारणा होणार आहे. |

**अनुसूची–तीन**

**पुनर्वसाहत क्षेत्राचे वर्णन**

पुनर्वसाहत करण्याची आवश्यकता नाही, सबब माहिती निरंक.

**अनुसूची–चार**

**पुनर्वसन व पुनर्वसाहत योजनेचा सारांश**

महाराष्ट्र शासन, अधिसूचना २६ एप्रिल, २०१८ भूमि संपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ चे कलम १० (क) अन्वये सिंचन प्रकल्पाला उक्त अधिनियमाचे प्रकरण २ व ३ यांच्या तरतुदी लागू करण्यापासून सूट देण्यात आली आहे.

**टीप :–** उक्त जमिनीच्या आराखड्याचे उपविभागीय अधिकारी, तुमसर यांचे कार्यालयामध्ये निरीक्षण करता येईल.

---

भाग १ (ना. वि. पु.) म. शा. रा., अ. क्र. ७८८.

**भूसंपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३,**

**अंतर्गत कलम ११ (१) ची प्रारंभिक अधिसूचना**

क्रमांक समअ-उपजि(भू)बावईप्रक-९-कावि-७७६-२०२५.—

ज्याअर्थी, भूमिसंपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ (२०१३ चा ३०) (ज्याचा उल्लेख पुढे " उक्त अधिनियम " असा करण्यात आला आहे.) च्या कलम ३ च्या खंड (ई) च्या परंतुकाद्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकाराचा वापर करून, काढण्यात आलेली शासकीय अधिसूचना, महसूल व वन विभाग, क्र. संकीर्ण ११-२०१४-प्र. क्र. ७७-अ-२, दिनांक ११ सप्टेंबर, २०१५ (यात यापुढे जिचा निर्देश " उक्त अधिसूचना " असा करण्यात आला आहे) याद्वारे असे अधिसूचित केले आहे की, उक्त अधिनियमाच्या कलम ३ च्या खंड (झेड-अ) मध्ये व्याख्या केलेल्या एखाद्या सार्वजनिक प्रयोजनासाठी, एखाद्या जिल्ह्यातील १०,००० हेक्टरपेक्षा अधिक नसेल इतक्या क्षेत्राकरिता जमीन संपादन करण्याच्या संबंधात, अशा जिल्ह्याचा जिल्हाधिकारी हा उक्त अधिनियमाच्या प्रयोजनासाठी समूचित शासन असल्याचे मानण्यात येईल ;

आणि ज्याअर्थी, उक्त अधिसूचनेनुसार समूचित शासन असलेल्या, भंडारा जिल्ह्याच्या जिल्हाधिकाऱ्यास यासोबत जोडलेल्या अनुसूची–एकमध्ये अधिक तपशीलवार वर्णन केलेली जमीन (यात यापुढे जिचा निर्देश " उक्त जमीन " असा करण्यात आला आहे) सार्वजनिक प्रयोजनासाठी (यात यापुढे ज्याचा निर्देश " उक्त सार्वजनिक प्रयोजन " असा करण्यात आला आहे) आवश्यक आहे अथवा तिची आवश्यकता भासण्याची शक्यता आहे, असे वाटते. ज्याच्या स्वरूपाचे विवरण यासोबत जोडलेल्या अनुसूची–दोनमध्ये दिलेले आहे ;

आणि म्हणून, उक्त अधिनियमाच्या कलम ११ च्या पोट-कलम (१) च्या तरतुदीन्वये याद्वारे असे अधिसूचित करण्यात येते की, उक्त जमिनीची उक्त सावर्जनिक प्रयोजनासाठी आवश्यकता भासण्याची शक्यता आहे.

आणि ज्याअर्थी, महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण क्रमांक ३८, दिनांक १३ मार्च २०१५ अन्वये सिंचन प्रकल्पांना उक्त अधिनियमाच्या प्रकरण दोन व तीन यांच्या तरतुदी लागू करण्यापासून सूट देण्यात आली असल्यामुळे या प्रकल्पासाठी सामाजिक प्रभाव निर्धारण करण्याची आवश्यकता उरलेली नाही ;

आणि ज्याअर्थी, उक्त अधिनियमाच्या कलम ४३ च्या पोट-कलम (१) अन्वये पुनर्वसन व पुनर्वसाहत या प्रयोजनासाठी नियुक्त केलेल्या प्रशासकाचा तपशील, यासोबत जोडलेल्या अनुसूची–पाचमध्ये दिलेला आहे. (नियुक्ती करणे आवश्यक असेल तर, या अनुसूचीमध्ये तपशील नमुद करावा) ;

परंतु, उक्त जमिनींच्या अथवा तिच्या भागाच्या मालकाने अर्ज केल्यावर, जिल्हाधिकाऱ्यास विशेष परिस्थितीची कारणे लेखी नमूद करून अशा मालकास उपरोक्त तरतुदीच्या प्रवर्तनातून सूट देता येईल.

परंतु आणखी असे की, जर कोणत्याही व्यक्तीने, या तरतुदीचे बुद्धीपुरस्पर उल्लंघन केल्यामुळे तिला झालेल्या कोणत्याही हानीची किंवा क्षतीची जिल्हाधिकाऱ्याकडून भरपाई दिली जाणार नाही.

तसेच, उक्त अधिनियमाच्या कलम ११ च्या पोट-कलम (५) अनुसार, जिल्हाधिकारी, भूमिसंपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क (महाराष्ट्र) नियम, २०१४ (यात यापुढे ज्याचा निर्देश " उक्त नियम " असा करण्यात आला आहे) याच्या नियम १० च्या उप-नियम (३) द्वारे विहित केल्याप्रमाणे भूमि अभिलेखाच्या अद्यावतीकरणाचे काम हाती घेणार असल्याचे व पूर्ण करणार असल्याचे देखील घोषित करण्यात येत आहे.

आणि म्हणून, त्याअर्थी, उक्त अधिनियमाच्या कलम ३ च्या खंड (छ) अन्वये, समुचित शासन असलेला जिल्हाधिकारी, भंडारा यांनी उक्त अधिनियमाखालील जिल्हाधिकाऱ्यांची कार्ये पार पाडण्यासाठी श्री. जे. पी. लोंढे उपजिल्हाधिकारी (भूसंपादन) बा.व.ई.प्र.क्र.९, भंडारा यास पदनिर्देशित केले आहे.

## अनुसूची-एक

## जमिनीचे वर्णन

भूसंपादन प्रकरण क्रमांक १-एल.एक्यु.एन.-२०२५-२०२६, मौजा -चिचाळ, तालुका-पवनी, जिल्हा-भंडारा.

**१) कामाचे नाव :-** गोसीखुर्द प्रकल्पाच्या बुडीत क्षेत्राकरीता.

| अनुक्रमांक | भूमापन किंवा गट क्रमांक | संपादित क्षेत्र |
|---|---|---|
| (१) | (२) | (३) |
| | | हे. आर |
| १ | ४४४/१ | १ २३ |
| २ | ७३९ | ० ३६ |
| ३ | १२२४ | ० ४३ |
| | एकूण संपादित क्षेत्र . . | २ ०२ |

## अनुसूची-दोन

## सार्वजनिक प्रयोजनाच्या स्वरूपाबाबत विवरण

| | | |
|---|---|---|
| प्रकल्पाचे नाव | :— | गोसेखुर्द प्रकल्प. |
| प्रकल्प कार्याचे वर्णन | :— | गोसेखुर्द प्रकल्पाच्या बुडीत क्षेत्राकरीता. |
| समाजाला मिळणारे लाभ | :— | २५०८०० हेक्टर क्षेत्राला सिंचनाचा लाभ मिळणार आहे. त्यामुळे लाभ क्षेत्रातील शेतकऱ्यांची आर्थिक स्थिती सुधारण्यास व बरोबरच रोजगारातही वाढ होणे अपेक्षित आहे. |

## अनुसूची-तीन

## बाधित व्यक्तींचे विस्थापन करण्यास भाग पाडणारी कारणे

सदर संपादनामुळे बाधित व्यक्तीचे विस्थापन होणार नाही.

## अनुसूची-चार

सामाजिक प्रभाव निर्धारणाचा सारांश : (सामाजिक प्रभाव निर्धारण अभ्यास करणाऱ्या अभिकरणाने दिलेला) भूमी संपादन, पुनर्वसन व पुनर्स्थापना करताना वाजवी भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ चे कलम ६(२) अनुषंगाने प्रकल्पाचे पर्यावरणीय प्रभाव निर्धारण झाले असल्याकारणाने SIA (सामाजिक प्रभाव निर्धारण) लागू नाही.

**अनुसूची–पाच**

**नियुक्त केलेल्या प्रशासकाचा तपशील**

| | | |
|---|---|---|
| (अ) प्रशासक म्हणून नियुक्त करण्यात आलेल्या अधिकाऱ्याचे नाव व पदनाम | : | प्रशासक नियुक्तीची आवश्यकता नाही. |
| (ब) प्रशासकाच्या कार्यालयाचा पत्ता | : | निरंक |
| (क) ज्या अधिसूचनेद्वारे प्रशासकाची नियुक्ती करण्यात आली आहे, त्या अधिसूचनेचा तपशील | : | निरंक |

**टीप :** —उक्त जमिनीच्या आराखड्याचे उपजिल्हाधिकारी (भूसंपादन) बा.व.ई.प्र.क्र.९, भंडारा यांचे कार्यालयामध्ये निरीक्षण करता येईल.

---

भाग १ (ना. वि. पु.) म. शा. रा., अ. क्र. ७८९.

**भूसंपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३, अंतर्गत कलम ११ (१) ची प्रारंभिक अधिसूचना**

क्रमांक-समअ-उपजि(भू)-बावईप्रक-९-कावि-७७७-२०२५.—

ज्याअर्थी, भूसंपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ (२०१३ चा ३०) (ज्याचा उल्लेख पुढे " उक्त अधिनियम " असा करण्यात आला आहे.) च्या कलम ३ च्या खंड (इ) च्या परंतुकाद्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकाराचा वापर करून काढण्यात आलेली शासकीय अधिसूचना, महसूल व वन विभाग, क्र. संकीर्ण ११-२०१४-प्र. क्र. ७७-अ-२, दिनांक ११ सप्टेंबर, २०१५ (यात यापुढे जिचा निर्देश " उक्त अधिसूचना " असा करण्यात आला आहे.) याद्वारे असे अधिसूचित केले आहे की, उक्त अधिनियमाच्या कलम ३ च्या खंड (झेड-अ) मध्ये व्याख्या केलेल्या एखाद्या सार्वजनिक प्रयोजनासाठी, एखाद्या जिल्ह्यातील १०,००० हेक्टर पेक्षा अधिक नसेल इतक्या क्षेत्राकरिता जमीन संपादन करण्याच्या संबंधात, अशा जिल्ह्याचा जिल्हाधिकारी हा उक्त अधिनियमाच्या प्रयोजनासाठी समूचित शासन असल्याचे मानण्यात येईल ;

आणि ज्याअर्थी, उक्त अधिसूचनेनुसार समुचित शासन असलेल्या, भंडारा जिल्ह्याच्या जिल्हाधिकाऱ्यास यासोबत जोडलेल्या अनुसूची–एकमध्ये अधिक तपशीलवार वर्णन केलेली जमीन (यात यापुढे जिचा निर्देश " उक्त जमीन " असा करण्यात आला आहे) सार्वजनिक प्रयोजनासाठी (यात यापुढे ज्याचा निर्देश " उक्त सार्वजनिक प्रयोजन " असा करण्यात आला आहे) आवश्यक आहे अथवा तिची आवश्यकता भासण्याची शक्यता आहे, असे वाटते. ज्याच्या स्वरूपाचे विवरण यासोबत जोडलेल्या अनुसूची–दोनमध्ये दिलेले आहे ;

आणि म्हणून, उक्त अधिनियमाच्या कलम ११ च्या पोट-कलम (१) च्या तरतुदीन्वये याद्वारे असे अधिसूचित करण्यात येते की, उक्त जमिनीची उक्त सावर्जनिक प्रयोजनासाठी आवश्यकता भासण्याची शक्यता आहे.

आणि ज्याअर्थी, महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण क्र. ३८, दिनांक १३ मार्च २०१५ अन्वये सिंचन प्रकल्पांना उक्त अधिनियमाच्या प्रकरण दोन व तीन यांच्या तरतूदी लागू करण्यापासून सूट देण्यात आली असल्यामुळे या प्रकल्पासाठी सामाजिक प्रभाव निर्धारण करण्याची आवश्यकता उरलेली नाही ;

आणि ज्याअर्थी, उक्त अधिनियमाच्या कलम ४३ च्या पोट-कलम (१) अन्वये पुनर्वसन व पुनर्वसाहत या प्रयोजनासाठी नियुक्त केलेल्या प्रशासकाचा तपशील, यासोबत जोडलेल्या अनुसूची–पाचमध्ये दिलेला आहे. (नियुक्ती करणे आवश्यक असेल तर, या अनुसूचीमध्ये तपशील नमुद करावा) ;

त्याअर्थी, आता, असे घोषित करण्यात येत आहे की, उक्त अधिनियमाच्या कलम ११ च्या पोट–कलम (४) अनुसार कोणतीही व्यक्ती, ही अधिसूचना प्रसिद्ध झाल्याच्या दिनांकापासून ते उक्त अधिनियमाच्या प्रकरण चार खालील कार्यवाही पूर्ण होईल त्या कालावधीपर्यंत उक्त जमिनीचा अथवा तिच्या भागाचा कोणताही व्यवहार करणार नाही किंवा उक्त जमिनीवर कोणताही भार निर्माण करणार नाही.

परंतु, उक्त जमिनींच्या अथवा तिच्या भागाच्या मालकाने अर्ज केल्यावर, जिल्हाधिकाऱ्यास विशेष परिस्थितीची कारणे लेखी नमूद करून अशा मालकास उपरोक्त तरतुदीच्या प्रवर्तनातून सूट देता येईल.

परंतु आणखी असे की, जर कोणत्याही व्यक्तीने, या तरतुदीचे बुद्धीपुरस्पर उल्लंघन केल्यामुळे तिला झालेल्या कोणत्याही हानीची किंवा क्षतीची जिल्हाधिकाऱ्याकडून भरपाई दिली जाणार नाही.

तसेच, उक्त अधिनियमाच्या कलम ११ च्या पोट-कलम (५) अनुसार, जिल्हाधिकारी, भूमि संपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क (महाराष्ट्र) नियम, २०१४ (यात यापुढे ज्याचा निर्देश " उक्त नियम " असा करण्यात आला आहे) याच्या